REVIEW OF RESEARCH

# 1960 ते 2015 या कालखंडातील साठोत्तरी दलित साहित्याचा ग्रंथसूचित्मक अभ्यास

प्रा. ऋषी सुखदेवजी गजभिये[1] , डॉ. डी. डब्लू. देवते[2]

[1] ग्रंथपाल , श्रीमती र.मो.पा. गृहविज्ञान महिला महाविद्यालय, अकलूज, जि. सोलापूर.
[2]ग्रंथपाल , बॅ. शेषराव वानखेडे महाविद्यालय, मोहपा, जि. नागपूर.

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 8 | MAY - 2019



**सारांश :**

1960 ते 2015 या कालखंडातील एकूण दलित साहित्याचा आढावा घेताना असे आढळून आले की, एकून साहित्यप्रकाराच्या तुलनेत सर्वाधिक साहित्य वैचारिक या प्रकारात म्हणजे 445 ग्रंथ प्रकाशित झाले. तर सर्वात कमी ग्रंथ प्रवासवर्णन या प्रकारात प्रकाशित झाले आहेत.

## प्रस्तावना :

मराठी साहित्यात 1960 पासून उदयास आलेला दलित साहित्याचा प्रवाह अतिशय समर्थपणे उभा आहे. शतकानुशतके मुक्या असलेल्या समाजाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या रूपाने मुकनायक मिळाला. डॉ. आंबेडकरांच्या विचारांनी आणि प्ररणेने दलित समाजाला आत्मभान प्राप्त झाले. त्यांच्यातील अस्मिता जागृत झाली आणि त्यातूनच दलितांची सुशिक्षित झालेली पहिली पिढी आपले अनुभव साहित्याच्या माध्यमातून आविष्कृत करू लागली. 1960 नंतरच्या कालखंडामध्ये दलित साहित्याची निर्मिती फार मोठ्या प्रमाणावर झाल्याचे आपणास दिसून येते.

## साठोत्तरी दलित साहित्य म्हणजे काय

सामाजिक व राजकीय चळवळीत दलित हा शब्द गेल्या शे-दिडशे वर्षात अनेक वेळेला वापरला गेला. हिंदू धर्माप्रमाणे दलित नावाची कोणतीही जात नाही. गरीब, अस्पृश्य, श्रमिक, कामगार, भूमिहीन, शेतमजूर, विकासापासून वंचित या विविध अर्थाने हा शब्द वापरला जातो. याच वर्गांना न्याय मिळावा, समता मिळावी या हेतूने चळवळ सुरू झाली. परिवर्तनाच्या चळवळीत दलित हा शब्द अतिशय व्यापक अर्थाने वापरला गेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रिपब्लिकन पार्टी ची स्थापणा करण्याचा मनोदय व्यक्त केला; त्यामध्ये अनुसूचित जाती, नवबौध्द, अन्य मागासवर्गीय, श्रमिक, भूमिहिन, शेतमजूर इ.चा समावेश करावा असे म्हटलेले आहे. सदर साहित्याचा उदय 1960 मध्ये झाल्यामुळे या साहित्याला साठोत्तरी दलित साहित्य असे म्हणतात.

## दलित साहित्याची व्याख्या :

### बाबुराव बागुल,

दलित म्हणजे वर्गव्यवस्थेला आणि तिच्या समग्र वैचारिक व्यवस्थेला उध्वस्त करू बघणारा, दलित म्हणजे हे जग व जीवन नव्याने मांडणारा, दलित म्हणजे या युगाने ज्याचे हात प्रज्ञावंत, प्रलयंकारी केलेल आहेत आणि ज्यांच्यासाठी शस्त्रे आणि शास्त्रे उपलब्ध करून दिलेली आहेत, अशा दलितांच्या साहित्यनिर्मितीला दलित साहित्य म्हणावे

### गंगाधर पानतावणे,

दलित साहित्य म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्याचा जाहिरनामा आहे. क्रांती विन्मुखता आणि क्रांती सन्मुखता यांच्या संघर्षातून निमाण झालेले साहित्य बंधमुक्त माणसांचा विचार करते.

## कालावधी :

सदर अध्ययनासाठी साठोत्तरी म्हणजेच 1960 पासून ते 2015 पर्यंत असा पंचावन्न वर्षाचा कालावधी निश्चित करण्यात आलेला आहे. प्राप्त माहितीचे विश्लेषण सुरूवातीला दर 10 वर्षाच्या

टप्प्यात व शेवटचा 5 वर्षाचा म्हणजे 2010 ते 2015 अशा टप्प्यात करण्यात आलेला आहे. तसेच संशोधन क्षेत्र महाराष्ट्र राज्य निश्चित करण्यात आलेले आहे.

### संशोधन पध्दती :

प्रस्तुत अध्ययनासाठी ऐतिहासिक पध्दत व विश्लेषणात्मक पध्दतीचा वापर केलेला आहे. ग्रंथांची माहिती गोळा करण्यासाठी ग्रंथालये, प्रकाशक इ. साधनांचा वापर करण्यात आला. नंतर प्राप्त माहितीचे विश्लेषण करून निष्कर्ष काढण्यात आले.

### तक्ता कमांक 1

1960 ते 2015 या कालखंडातील साठोत्तरी दलित साहित्यातील कविता या वाड्मय प्रकाराचे सुरूवातीचे 10 वर्ष व शेवटच्या 5 वर्षाच्या कालखंडानुसार विश्लेषण.

| वर्ष | प्रकाशित पुस्तकांची संख्या | टक्केवारी | संचयी टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1960 ते 1970 | 6 | 1.8 | 1.8 |
| 1971 ते 1980 | 26 | 7.8 | 9.6 |
| 1981 ते 1990 | 45 | 13.4 | 23.0 |
| 1991 ते 2000 | 132 | 39.4 | 62.4 |
| 2001 ते 2010 | 108 | 32.2 | 94.6 |
| 2011 ते 2015 | 18 | 5.4 | 100.00 |
| एकुण | 335 | 100.00 | |

### तक्ता कमांक 2

1960 ते 2015 या कालखंडातील साठोत्तरी दलित साहित्यातील कथा या वाड्मयप्रकाराचे सुरूवातीचे 10 वर्ष व शेवटच्या 5 वर्षा च्या कालखंडानुसार विश्लेषण.

| वर्ष | प्रकाशित पुस्तकांची संख्या | टक्केवारी | संचयी टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1960 ते 1970 | 16 | 13.2 | 13.2 |
| 1971 ते 1980 | 7 | 5.8 | 19.0 |
| 1981 ते 1990 | 24 | 19.8 | 38.8 |
| 1991 ते 2000 | 25 | 20.7 | 59.5 |
| 2001 ते 2010 | 29 | 24.0 | 83.5 |
| 2011 ते 2015 | 20 | 16.5 | 100.00 |
| एकुण | 121 | 100.00 | |

### तक्ता कमांक 3

1960 ते 2015 या कालखंडातील साठोत्तरी दलित साहित्यातील वैचारिक या प्रकाराचे सुरूवातीचे 10 वर्ष व शेवटच्या 5 वर्षाच्या कालखंडानुसार विश्लेषण.

| वर्ष | प्रकाशित पुस्तकांची संख्या | टक्केवारी | संचयी टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1960 ते 1970 | 4 | 0.9 | 0.9 |
| 1971 ते 1980 | 12 | 2.7 | 3.6 |
| 1981 ते 1990 | 64 | 14.4 | 18.0 |
| 1991 ते 2000 | 114 | 25.6 | 43.6 |

LBP PUBLICATION

| | | | |
|---|---|---|---|
| 2001 ते 2010 | 167 | 37 . 5 | 81 . 1 |
| 2011 ते 2015 | 84 | 18 . 9 | 100 . 00 |
| **एकुण** | **445** | **100 . 00** | |

**तक्ता क्रमांक 4**

साठोत्तरी दलित साहित्यातील विविध साहित्य प्रकाराचे 1960 ते 2015 या 55 वर्षाच्या कालखंडानुसार विश्लेषण .

| साठोत्तरी दलित साहित्य प्रकार | एकुण संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| कविता | 335 | 19 . 9 |
| कथा | 121 | 7 . 2 |
| कादंबरी | 179 | 10 . 6 |
| चरित्र | 50 | 3 . 0 |
| आत्मचरित्र | 92 | 5 . 5 |
| नाटक | 120 | 7 . 1 |
| एकांकिका | 5 | 0 . 3 |
| प्रवास वर्णन | 3 | 0 . 2 |
| सदर लेखन | 14 | 0 . 8 |
| ललित गद्य | 10 | 0 . 6 |
| समीक्षा ग्रंथ | 240 | 14 . 2 |
| वैचारिक | 445 | 26 . 4 |
| अनुवाद | 15 | 0 . 9 |
| संपादकीय | 56 | 3 . 3 |
| **एकुण** | **1685** | **100 . 00** |

**संदर्भ ः**

1 . बागूल बाबुराव ः दलित साहित्य संमेलन, नागपूर ः उद्घाटनाचे भाषण, 1976 .
2 . पानतावणे गंगाधर ः दलित साहित्य ः चर्चा आणि चिंतन, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, 1993 .
3 . वाघमारे जनार्दन ः दलित साहित्याची वैचारिक पार्श्वभूमी, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, 1998 .
4 . फडके भालचंद्र ः दलित साहित्य ः वेदना आणि विद्रोह, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, 2000 .
5 . आगलावे प्रदीप ः सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर,2015
6 . जैन प्रकाश, देशपांडे दत्तात्रय, डाखोळे प्रमोद, खेडकर अशोक ः सुलभ ग्रंथालय शास्त्र, विश्व पब्लिशर्स व डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर, 2001 .

LBP PUBLICATION